# कार्यालय चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

दुरध्वनी क्र.०७१७१-२५५६५०/२५३/२२०/२५३ email: com.chandrapur @gmail.com

क्रमांक :- चंशमनपा/साप्रवि / १८६० /२०२०/ दि.१९/११/२०२०

**आदेश:**

ज्याअर्थी, माननीय हरित लवाद यांनी हवेतील प्रदूषण पातळीचा विचार करुन विविध शहराचे वेगवेगळया प्रकारात वर्गीकरण केलेले आहे, व

ज्याअर्थी, चंद्रपूर शहराचे हवेची प्रदूषण पातळी विचारात घेता चंद्रपूर शहराचे वर्गीकरण मध्यम स्वरुपाच्या हवा प्रदूषीत शहरामध्ये करण्यात आली आहे, व

ज्याअर्थी, मा. हरित लवाद यांचे OA 249/2020 नुसार दि ०९ नोव्हेंबर २०२० च्या आदेशानुसार हवेचे प्रदूषणाचे मध्यम प्रकारच्या वर्गीकृत शहरात फटाके विक्री तथा फटाके फोडणे यावर बंदी घातलेली आहे, व

ज्याअर्थी अशा मध्यम वर्गवारीच्या हवा प्रदूषित शहरात आगामी दिवाळीच्या, छट पूजा व खिसमस व नूतन वर्ष आगमनाचे दिवशी फक्त पर्यावरण पूरक फटाके ( Green Crackers) केवळ दोन तास, रात्री आठ ते दहा या वेळीच फोडण्यास परवानगी दिलेली आहे, व

ज्याअर्थी, अशा शहरामध्ये फटाके विक्रीस सुद्धा बंदी घालण्यातबाबत मा. हरित लवादाचे आदेश आहेत.

त्याअर्थी, चंद्रपूर शहरामध्ये यंदाच्या दिवाळी सणाच्या दिवसात त्याचप्रमाणे आगामी छट पूजा, खिसमस तसेच नूतन वर्ष आगमना निमित्य फटाके विरहित सण साजरे करण्याचे आदेश याव्दारे मी निर्गमीत करीत आहे.

चंद्रपूर शहरात पारंपारिक फटाक्यांची विक्रीला सुद्धा या आदेशानूसार मनाई करण्यात येत आहे.

नागरिकांना फटाके फोडायचे असल्यास उपरोक्त सणांच्या दिवशी रात्री ८ ते १० या वेळेसच केवळ Green Crackers (ज्या फटाक्यांवर CSIR/NEERI यांचा QR code असेल ) प्रकारच्या फटाक्यांचा वापर करावा.

या आदेशाचे उल्लंघन करणारे नागरिक पोलीस कारवाईस पात्र राहतील.

स्वा/-

(राजेश मोहिते)
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

प्रतिलीपी:१) मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
२) मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना माहितीस तथा कार्यवाहीस सविनय सादर.
३) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

(राजेश मोहिते)
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर